MAH/NAN/10936/2015
ISSN : 2454-7905
SJIF 2021 - Impact Factor : 7.479

# Worldwide International Inter Disciplinary Research Journal

(A Peer Reviewed)

Year - 7, Vol. I, Issue- LV, 28 March 2022

शासकिय अध्यापक महाविद्यालय, नांदेड.
संलग्नित
स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड.
अंतर्गत गुणवत्ता हमी कक्ष यांच्या द्वारा आयोजित

एक दिवसीय आंतरविद्याशाखीय राष्ट्रीय परिसंवाद (ऑनलाईन)

## मराठी साहित्यातील स्त्री प्रतिमा



* प्रमुख संपादक *
प्राचार्य डॉ. उर्मिला धूत

* संपादक *
प्रो.डॉ. शैला सारंग

* सह संपादक *
प्रो.डॉ. वनिता रामटेके

| | | | |
|---|---|---|---|
| 12. | स्त्रीत्व, स्त्रीवाद, स्त्रीमुक्तीआणिमराठीकविता | श्रीमती अनिता तुकाराम यलमटे<br>डॉ. विलास पाटील | |
| 13. | साहेब खंदारे यांच्या एकांकिकांतील अभिव्यक्त स्त्री प्रतिमा | प्रा. डॉ. कांत वसंतराव जाधव | |
| 14. | मराठी स्त्री गीतांतून अभिव्यक्त झालेल्या स्त्री प्रतिमा | साईप्रसाद मधुकर पंडित | |
| 15. | मराठीतील निवडक स्त्रीवादी कवयित्रींच्या काव्यातील प्रतिमाविश्व :एक अभ्यास | सौ सागर गोविंदराव पांचाळ | |
| 16. | एकोणिसाव्या शतकात स्त्रीयांच्या उन्नतीसाठी महाराष्ट्रामध्ये झालेल्या कार्याचा आढावा- एक अभ्यास | डॉ. गोपाळ रामराव पवार<br>भगवान रामकृष्ण केंद्रे | 7 |
| 17. | संत मन्मथ स्वामी यांच्या अभंगातील स्त्री विषयक विचार | डॉ. विजयकुमार शिवदास ढोले | 7 |
| 18. | मराठी 'स्त्रीवादी' कादंबरीतून व्यक्त झालेली 'स्त्री' प्रतिमा | प्रा. डॉ. कल्पना गावडे | 81 |
| 19. | संत जनाबाईचे भावविश्व | डॉ. रवींद्र बेम्बरे | 88 |
| 20. | सानियायांचे कथनपर साहित्य : स्त्रीच्या आत्मभानाचा प्रगल्भ प्रवास | डॉ. माधुरी पाथरकर | 92 |
| 21. | मराठी साहित्यातून अभिव्यक्त झालेली स्त्री प्रतिमा | श्री. शिंदे चंद्रशेखर उत्तमराव<br>प्राचार्य डॉ. मधुकर आं. पुंडगे | 96 |
| 22. | मराठी साहित्यातील ग्रामीण स्त्री | सुनिल रामराव काकडे | 101 |
| 23. | विभावरी शिरुरकर यांच्या 'हिंदोळयावर' कादंबरीतील स्त्री प्रतिमा | प्रा. डॉ. विजय गणपतराव वारकड | 104 |
| 24. | मध्ययुगीन भारतातील स्त्री शिक्षणाची स्थिती | कदम गणेश पुंडलिकराव<br>प्रा. डॉ. वैजयंता ना. पाटील | 107 |
| 25. | मराठी लोकसाहित्यातून अभिव्यक्त झालेली स्त्री प्रतिमा | प्रा. बबन अण्णासाहेब गित्ते | 112 |
| 26. | मराठी संत साहित्यातून अभिव्यक्त झालेली स्त्री प्रतिमा | वैशाली सुभाष पारधे | 117 |

Worldwide International Inter Disciplinary Research Journal (A Peer Reviewed Referred) ISSN – 2454 -

# सानिया यांचे कथनपर साहित्य : स्त्रीच्या आत्मभानाचा प्रगल्भ प्रवास

डॉ. माधुरी पाथरकर

सतीश प्रधान ज्ञानसाधना महाविद्यालय, ठाणे

१९८० नंतरच्या दोन दशकांमध्ये भारतातील समाजजीवन आमूलाग्र बदलले. झपाट्याने पसरणारी शहरीक आधारित जीवनपद्धती आणि माणसांचे परस्परांशी आणि समाजव्यवस्थेशी असणारे नाते यातील द्वंद्व हा या बदलाचा मु घटक म्हणता येईल. या सर्व बदलांच्या पार्श्वभूमीवर भारतीय समाजव्यवस्थेतील विविध घटकांमध्ये स्थूल आणि पातळीवर घडणाऱ्या स्थित्यंतराचा वेध अनेक स्त्री-लेखकांच्या साहित्यामध्ये घेतलेला दिसतो. याच काळातील महत्त्वाची लेखक सानिया आहेत. सानियाच्या कथा-कादंबऱ्यांमध्ये व्यक्ति-व्यक्तींमधील नात्यांचा शोध, कुटुंबसंस्था, लग्नसंस्था परस्पर मैत्र-संबंध पुनरावृत्त झालेले आहेत. किंबहुना हे त्यांच्या कथा-कादंबऱ्यांचे बलस्थान आहे. सानियाच्या मते, 'मा नाती हा तर मनुष्यजीवनाचा गाभा आहे. त्यामुळे मर्यादा ही जगण्याची नसते. विचारांची व आकलनाची असते… मी नात्यांचा शोध घेत आले. त्यांच्या आधारेच बऱ्याचदा स्त्रीप्रतिमा स्वत्त्वाचा शोध घेतात.' या शोधनिबंधात सानिया यां निवडक कथा आणि कादंबऱ्यांच्या संदर्भात त्यांच्या स्त्रीप्रतिमांच्या सामान्यातील असामान्यतेचा विचार करणार आहे.

एकोणिसशे ऐंशीनंतर समाजात सर्वच पातळ्यांवर झपाट्याने बदल होत होते. स्त्रीजीवनही बदलत होते. स्त्री शिक्षणक्षेत्रात, तंत्रज्ञान क्षेत्रात तसेच जीवनाच्या अनेक क्षेत्रात उच्चपदे भूषवित होत्या, उच्चशिक्षण घेत होत्या. वैचारि संशोधन क्षेत्रातही त्या सक्रीय होत होत्या. त्यांच्या सर्वांगीण विकासाला पोषक असे वातावरण त्यांना दिसत होते. आपल क्षमता आजमावण्याची नवी क्षितीजे त्यांना दिसत होती. सत्तरच्या दशकापासून स्त्रीस्वातंत्र्याची चळवळ महाराष्ट्रात चा होती. त्याचे अनेक पैलू स्त्रीमनाला कळत होते. त्याचा प्रभाव सानियाच्या काही स्त्रीपात्रांवर दिसून येतो. त्यांच्या कथा कादंबऱ्यांतील स्त्रीपात्रे ही बुद्धिमान, सारासार विचार करणारी, निर्णयक्षमता असलेली, उच्चविद्याविभूषित आहेत. त्यामु अनेकदा चौकटीबाहेरचे निर्णय ही पात्रे सहज घेताना दिसतात आणि इतकेच नाही तर पेलवतानाही दिसतात. आमन कथेमधील सरिता आपल्या मुलीला नवरा जयतीर्थकडे उच्चशिक्षणासाठी जसे पाठवते, तसेच सुरुवातीला त्याच्याशिवा एकटीने तिला सांभाळण्याचाही निर्णय घेते. हे करत असताना तिच्या मनात वडिलांविषयी कोणतीही कटुता निर्माण होणा नाही अशा पद्धतीने अतिशय सहजभावाने मुलीला वाढवते. *प्रवास* कथेमधील सावित्री पारंपरिक साच्यातील आई हो विचारपूर्वक नाकारते. वास्तविक तिला मूल नको असणं हा निर्णयही ती बोलून दाखवते. म्हणजे सर्वसाधारणपणे स्त्रीला मातृत्वामध्ये जी जीवनाची फलश्रुती दिसते ती या स्त्रीपात्रांना वाटत नाही. हे परंपरागत स्त्रीप्रतिमेला छेद देणारे आहे याच्याउलट *स्थलांतर* कादंबरीतील मिनाक्षीला वैवाहिक जीवनात येणारा शारीरिक प्रणयसुद्धा गर्भाशयात रूजवायला जीव हवा म्हणून हवा असतो. लग्नाचा हाच हेतू तिला दिसतो. मातृत्वाचा सर्जनाच्या पातळीवरचा अनुभव घेण्यापेक्षा वेळ चांगला जाईल म्हणून मिनाक्षीला मूल हवे आहे. हा अपारंपरिक विचार निवेदक सांगते. परंपरागत विचारमूल्यांचा दबाव, ताण या स्त्रीप्रतिमा स्वतःवर घेत नाहीत. त्या आपल्या मनाला आणि विवेकबुद्धीला पटतील त्या निर्णयांवर ठाम राहतात. तर *स्थलांतर* कादंबरीतील नंदिता स्वतः सोडलेल्या नवऱ्याचा, शंतनूच्या मुलाचा गर्भ त्याला न सांगता पाडण्याचा निर्णय घेते. *आवर्तन* कादंबरीतील सुरुची श्रीरंगबरोबर लग्न न करता राहण्याचा निर्णय घेते, तो श्रीरंग सुचवतो म्हणून नाही तर तिला स्वतःला पटल्यावरच. पण मनात खोल प्रश्नचिन्ह ठेवून. तसेच जगदीशचा कौल घेऊन *स्थलांतर*मधील नंदिता विश्वंभरशी दुसरं लग्न करण्याचा निर्णय घेते. आणि *अवकाश* कादंबरीतील जान्हवीही आपल्या पहिल्या नवऱ्याच्या मृत्यूनंतर अनेक वर्षांनी पहिल्या नवऱ्याच्या मुलाच्या-कार्तिकच्या इच्छेखातर सदाशिवशी दुसरे लग्न करण्याचा निर्णय घेते.

या सगळ्या नायिका आजच्या काळातील वाटतात. त्या सभान आहेत, विचारी आहेत, सुशिक्षित आहेत. त्या समाजव्यवस्था नाकारत नाहीत पण समाजव्यवस्थेच्या चौकटीत राहून त्या आपल्या आयुष्याचे निर्णय पूर्ण विचारांती घेतात. *आवर्तन*मधील सुरुची श्रीरंगशी लग्न न करता एकत्र राहण्याचा निर्णय घेते पण तिच्या मनात असंख्य ताण आहेत. ती तिच्या आजीला – नीनीला याबद्दल काहीही कळवत नाही. कारण तिच्याशी असलेले रक्ताचे बंध तिला तोडायचे नसतात. पण श्रीरंगच्या अपघाती मृत्यूनंतर ती परत तिच्याच कुशीत जाते. *अवकाश*मधील जान्हवी राघवनबरोबर असलेले कोरडे वैवाहिक जीवन निभावतच असते. भावनिक ओलावा नसलेले वैवाहिक जीवन तिने प्रगल्भतेने स्वीकारलेले असते. वास्तविक तिचे सुदर्शनवर प्रेम असते व त्या दोघांना लग्न करायचे असते. पण कौटुंबिक कारणामुळे ते शक्य होत नाही तेव्हा ती व्यवस्थाशरण होऊन चाकोरीतला संसार करण्याचा निर्णय घेते. कारण तिच्यासमोर दुसरा पर्याय नसतो आणि सर्वच नाकारून तिला स्वतंत्र वाट चोखाळायची नसते. आजूबाजूला अशा स्त्रिया आपल्याला दिसतात. त्या व्यवस्थेच्या विरोधात जाऊन चौकटीबाहेरची वाट निवडत नाहीत. याचा अर्थ त्या कमकुवत असतात असे नाही. त्यांच्यात विचारक्षमता आणि निर्णयक्षमता असते, पण